जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०१/०७/२०२३
## दि.३०/०६/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडकी पो.स्टे.१९५/२०२३,भादविक ३०७,३२३,५०४,५०६,३४,आर्म अॅक्ट कलम ४(२५) सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१) सह १३५, सह क्रिमिनल लॉ अमेंडमेंट अॅक्ट कलम ७ |
| **फिर्यादी** | पवन घागट, वय ४६ वर्षे, रा.बोपोडी,पुणे |
| **आरोपीत** | १.गणेश विष्णु अडागळे वय २० वर्षे रा.बापु काटे चाळ वॉर्ड नं.०३ दापोडी पुणे (अटक) २.विधी संघर्षित बालक रा.दापोडी पुणे (ताब्यात घेवुन सोडुन देण्यात आले आहे) व त्यांचा एक साथीदार |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ३०/०६/२०२३ रोजी दुपारी १६/०० वा. चे सुमारास छाजेड पेट्रोल,बोपोडी, पुणे येथे घडला असे. |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे भाजीपाला आणणेकामी जावई व मुलगी यांचेसह जात असताना बोपोडी येथील छाजेड पेट्रोल पंपावर पेट्रोल भरतेवेळी फिर्यादीचे मागुन एक अॅक्टीव्हा मोपेड गाडीवर बसुन तिन अनोळखी मुले आली व त्यांच्या गाडीचा धक्का फिर्यादीचे गाडीस लागल्याने फिर्यादी यांनी त्यास जाब विचारता त्यांनी शिवीगाळ व धक्काबुक्की करुन "आम्ही या एरियाचे भाई आहोत तु ओळखत नाही काय" असे म्हणुन अॅक्टीव्हा वरील चालकांने त्याचे कमरेला शर्टच्या खाली ठेवलेले लोखंडी हत्यार काढुन त्या हत्याराने फिर्यादीवर प्राणघातक हल्ला चढवुन फिर्यादीस जखमी करुन त्यांनी त्यांचेकडील हत्यार हवेत फिरवुन तेथे उपस्थित लोकांना दमदाटी केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.आण्णा गुंजाळ मो.नं.९९७०७४६४५६ |

**२**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | मुंढवा पो स्टे २०३/२०२३,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक इसम वय ३८ वर्षे, रा.वाघोली,पुणे |
| **आरोपीत** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २८/०६/२०२३ रोजी सकाळी ०६/३० वा.चे सुमा.मुंढवा चौकाचे जवळील बस स्टॉपचे जवळ,मुंढवा, पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे मोबाईलमध्ये व्हाट्सअॅपवरील मेसेज बघत उभे असताना,नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांचे हातातील मोबाईल १५,०००/-रू किमतीचा जबरदस्तीने हिसका मारुन चोरुन नेला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.संदीप जोरे,मो.नं.९४०३५४७५० |

**३**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो.स्टे.४१७/२०२३,भादविक २७९,३०४(अ),३३८,मोवाका क.११९/१७७ |
| **फिर्यादी** | कृष्णा पाटील वय २४ वर्षे रा.परभणी ता जि परभणी |
| **आरोपीत** | रोहीत सुभाष शिर्के वय २५ वर्षे रा.परभणी जि.परभणी (मयत) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २८/०६/२०२३ रोजी सांयकाळी १७/०० वा.महानंद डेअरी समोर ओढयामध्ये भिलारेवाडी कात्रज |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, हयगयीने, अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी यातील फिर्यादी व त्यांचा मित्र रोहीत सुभाष शिर्के हा स्वतःचालवत असलेली मोटार सायकल सह खड्डयात पडुन गंभीर जखमी होवुन स्वतःचे मृत्युस कारणीभुत होऊन व फिर्यादी यांचे कपाळाला गुडघ्याला पायाला गंभीर जखमी करणेस कारणीभुत झाला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.थोरात मो.नं.९८५०१०७६२९ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बिबवेवाडी पो.स्टे.११८/२०२३,भादविक ४१९,४२०,माहीती तंत्रज्ञान कायदा कलम ६६(सी),६६(डी) |
| **फिर्यादी** | एक महिला वय २५ वर्षे रा.बिबवेवाडी, पुणे, |
| **आरोपीत** | अज्ञात मोबाईल व अकाऊंट धारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | दिनांक ३०/०६/२०२३ रोजी सकाळी ०९/१५ वा.चे.फिर्यादी हया घरी असतांना त्यांचे मोबाईल फोनवर अनोळखी मोबाईल क्रमांका वरून फोन करून फिर्यादींना स्काईप ॲप डाऊनलोड करण्यास सांगुन त्यावर त्यांचेशी संभाषण करून फिर्यादी यांचा विश्वास संपादन करून ते पोलीस बोलत असल्याचे भासवून फिर्यादी हया मनी लॉंडरींग मध्ये सहभागी नाही हे सिध्द करण्यासाठी त्यांचे अकाऊंटवर पैसे ऑनलाईन भरण्यास सांगुन फिर्यादी यांची १,७४,६३१/- रूपयांची आर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरीक्षक (गुन्हे) अनिता हिवरकर,मो.नं.७०२०७०३८१३ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो.स्टे.६५३/२०२३,भादविक २७९,३०४(अ),४२७,मोटर वाहन कायदा ११९/१७७,१८४,१३४(अ)(ब) |
| **फिर्यादी** | अरुण मांढरे,वय ३२ वर्षे,रा.उंड्री पुणे |
| **आरोपीत** | कार चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २९/०६/२०२३ रोजी दुपारी १३/२२ वा.चे.सुमारास एम.डी.मिठाई दुकानाचे जवळ,काळुबाई मंदिरा समोर,वडाची वाडी रोड,उंड्री येथे सार्वजनीक रोडवर |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील कार ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी फिर्यादी यांचे ओळखीचे इंद्रजित बंडोपंत यादव,वय ३९ वर्षे,रा. ॲरोनेस्ट सोसायटी,वडाचीवाडी रोड उंड्री पुणे यांचे ॲक्टीव्हा गाडीस जबर ठोस मारून,इंद्रजित यादव यांना गंभिर जखमी करुन त्यांची अल्पवयीन मुलगी वय ०५ वर्षे हिस गंभीर जखमी करुन तीचे मृत्युस कारणीभुत झाला आहे.तसेच त्यांचे दुचाकी गाडीचे नुकसान करुन सदरचे अपघाताची खबर न देता,पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | पो.हवा ४८८५ रासकर, मो.नं.८६८९९४५९९९ |

६

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रांतवाडी पो.स्टे.१६३/२०२३,भादविक ४२०,५११ |
| **फिर्यादी** | एक इसम वय ४६ वर्षे,रा.दिघी कॅम्प,पुणे |
| **आरोपीत** | दिपचंद करमबिर वय २५ वर्षे घर नं ४४३,गाव एवं पोस्ट-बधवार,तहसिल-बरवाला,जिला-हिस्सार,राज्य-हरीयाना (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ३०/०६/२०२३ रोजी सकाळी ०८/०० ते ११/०० वा.च्या सुमारास ग्रीफ,बॉर्डर रोड ऑरगनायझेशन, मिनिस्ट्री ऑफ डिफेन्स,बी.आर.ओ.स्कुल ॲन्ड सेंटर,भैरवनगर,धानोरी पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे असीस्टंट ॲडम ऑफिसर,ग्रीफ,बॉर्डर रोड ऑरगनायझेशन,मिनिस्ट्री ऑफ डिफेन्स, येथे नोकरीस असुन यातील नमुद इसम दिपचंद करमबिर वय २५ वर्षे घर नं ४४३,गाव एवं पोस्ट-बधवार,तहसिल-बरवाला,जिला-हिस्सार,राज्य-हरीयाना याने बी आर ओ स्कुल ॲन्ड सेंटर पुणे यांच्या व्दारा व्हेईकल मेकॅनिक या पदासाठी घेतल्या जाना-या लेखी परीक्षेत स्वःता जवळ पेनच्या कॅप मध्ये एक इलेक्ट्रॉनिक डिव्हाईस आणी अंडर विअर मध्ये एक सॅमसंग चा मोबाईल ठेवुन नमुद इलेक्ट्रॉनिक डिव्हाईस च्या माध्यमातुन परीक्षेत आलेले प्रश्नाचे उत्तर लिहीन्याचा प्रयत्न केला म्हणुन गुन्हा |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.एस.एस.माळी मो.नं.९८२३७१७०८० |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**